# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला, काकडे बीज आयकॉन, पुणेविद्यापीठ रोड, अशोक नगर ई स्क्वेअर जवळ, शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाइट : www.srapune.gov.in


जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.२२६/१०३८/२०२१
दि. २३/११/२०२१.

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) जा.क्र.झोपुप्रा/१४८६/२०१६ दि.३१/०८/२०१६.

२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.११४/२०१८, दि. २३/०१/२०१८.

३) योजनेचे वास्तुविशारद यांनी केलेला अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि.२८/१०/२०२१ रोजीचा विनंती अर्ज.

४) दि.२९/१०/२०२१ रोजीच्या टिपणीस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि.२३/११/२०२१ रोजी मान्यता.

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे सि.स.नं.५४, एरंडवणा, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र.११४/२०१८, दि.२३/०१/२०१८ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्याने योजनेचे वास्तुविशारद यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या इमारतीकरीता अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

मंजुर बांधकाम नकाशानुसार इमारत निहाय तरतुद खालीलप्रमाणे आहे.

इमारत - (पुनर्वसन + विक्री)

| अ.क्र. | मजले | सदनिका (पुनर्वसन घटक) | | सदनिका (विक्री घटक) | | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नकाशा मंजूरीनुसार | भोगवटा द्यावयाच्या प्रत्यक्षात स्थळपाहणी दरम्यान | नकाशा मंजूरीनुसार | भोगवटा द्यावयाच्या प्रत्यक्षात स्थळपाहणी दरम्यान | |
| १) | तळ मजला | पार्कींग + सोसायटी ऑफ़िस + टॉयलेट | | | | पार्कींग + सोसायटी ऑफ़िस + टॉयलेट |
| २) | पहिला मजला | १०२, १०३ | १०२, १०३ | १०१ | १०१ | ०३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | दुसरा मजला | २०२, २०३ | २०२, २०३ | २०१ | २०१ | ०३ |
| ४) | तिसरा मजला | ३०२, ३०३ | ३०२, ३०३ | ३०१ | ३०१ | ०३ |
| ५) | चौथा मजला | ४०२, ४०३ | ४०२, ४०३ | ४०१ | ४०१ | ०३ |
| ६) | पाचवा मजला | ५०२,५०३ | ५०२,५०३ | ५०१ | ५०१ | ०३ |
| ७) | सहावा मजला | निरंक | निरंक | ६०१,६०२,६०३ | ६०१,६०२,६०३ | ०३ |
| एकुण | | १० | | ०८ | | १८ |
| इमारतीकरीता भोगवटा द्यावयाच्या एकूण सदनिका- १८ सदनिका + सोसायटी ऑफ़िस + टॉयलेट | | | | | | |

पुनर्वसन घटक :- १० सदनिका
विक्री घटक :- ०८ सदनिका
एकूण :- १८ सदनिका + सोसायटी ऑफिस + टॉयलेट

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी उक्त इमारतीच्या बांधकामा सबंधित आर्कीटेक्ट यांनी दिलेल्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसक यांनी दिलेल्या पत्राच्या आधारे खालील नमुद अटी व शर्तीस अधीन राहून अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंतिम बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.
२) अंतिम बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंतिम बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.
४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.
५) मंजुर नकाशानुसार इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.
६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
७) विषयांकित योजना रस्तारुंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, अंतिम भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

९) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्काची एकूण रक्कम टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

१०) सदर योजनेकरीता आवश्यक असणारे वॉटर हार्वेस्टींग, घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे प्रयोजन करणे पुढील टप्प्याचा टीडीआर घेणेपुर्वी प्रस्तावित करणे बंधनकारक आहे. तसेच तळ मजल्यावर रेकॉर्ड प्लॅन सादर केलेनुसार नकाशे मंजुर करणे बंधनकारक आहे अन्यथा पुढील टप्प्यातील टीडीआर अदा केला जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

23/11/2021

प्र. सहायक संचालक नगररचना
झो.पु.प्रा., पुणे.

प्रत :- १) विकसक युनिटी कन्स्ट्रक्शन्स
सि.स.नं.३८३,सदाशिव पेठ/ नवी पेठ, शिंदे हाईट्स,
विठ्ठल मंदिराजवळ , न्यु इंग्लिश स्कूल मागे, पुणे-३०

२) आर्कि एट्रीएम डीझाईन स्टुडीओ आर्की ॲण्ड इंजिनिअर्स
सि.स.नं.४३३/४ बंगला नं. ४, पहिला मजला,
सारस्वत हौ. सोसा.,जुन्या झेड.पी. मागे ,सोमवार पेठ,पुणे-०१

३) तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.